# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०७/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा आषाढी एकादशी व मोहरम निमित्ताने रूटमार्च

पोलीस स्टेशन सावनेर येथे आज दिनांक १६/०७/२०२४ रोजी १६.३० वा. ते १७.३० वाजता पर्यंत आषाढी एकादशी व मोहरम निमित्त मा. श्री. अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे उपस्थितीमध्ये गांधी चौक, गडकरी चौक, जयस्तंभ चौक, मडकी चौक, होळी चौक परत पोलीस स्टेशन पर्यंत रूट मार्च घेण्यात आला रूट मार्चमध्ये १६ अधिकारी, १६८ अंमलदार, ६६ होमगार्ड हजर होते.

तसेच पोलीस स्टेशन काटोल येथे मा. उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहोम काटोल विभाग काटोल यांच्या उपस्थितीत काटोल शहरात बस स्टॉप परीसर, ईराणी मोहल्ला, मेन रोड बाजार परिसरात, शनि चौक, हत्तीखाना शहर मस्जिद, पेठ बुधवार सुभाष चौक, येथे रुट मार्च करण्यात आला व पेठ बुधवार सुभाष चौक येथे मॉक ड्रिल करण्यात आले. रुटमार्च करीता उप विभाग कोंढाळी येथुन ०५ अंमलदार, जलालखेडा ०१ अधिकारी , ०५ अंमलदार, नरखेड व पोलीस स्टेशन काटोल येथील ०४ अधिकारी, २० अंमलदार, ३० सैनिक हजर होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर